**अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/ ई-१५४९०५२/विशि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई : ४०००३२.
दिनांक : २८ एप्रिल, २०२६.

**वाचा :-** १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/(१४४/१७)/विशि-४, दिनांक १९ जानेवारी, २०१९.
२) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३.
३) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) नियम, २०२४.

**प्रस्तावना** :-

राज्यातील उच्च शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्तता प्रदान होण्याच्या उद्देशाने, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे रूपांतर खाजगी विद्यापीठात (Private Universities) करण्याची मागणी/विचारणा शैक्षणिक संस्थांकडून होत असल्याने, शैक्षणिक, तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय पैलू विचारात घेऊन एक सर्वसमावेशक धोरण तयार करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विषयांकित बाबींचा सखोल अभ्यास करून शासनास शिफारशी सादर करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्याबाबत धोरण निश्चितीच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग | अध्यक्ष |
| २ | उप सचिव (विद्यापीठ शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३ | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ४ | सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे | समन्वयक तथा सदस्य सचिव |

२. समितीची कार्यकक्षा-

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

(१) अनुदानित महाविद्यालयांचे विद्यापीठात रूपांतर करण्यासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक कामगिरी, पायाभूत सुविधा आणि संशोधनाचा दर्जा यांचे निकष ठरवणे.

(२) अनुदानित महाविद्यालयाला शासनाने जमिन उपलब्ध करुन दिली असेल तर त्या जमिनीबाबत धोरण निश्चित करणे.

(३) अनुदानित महाविद्यालयांचे रूपांतर खाजगी विद्यापीठामध्ये झाल्यानंतर, शासनाकडून मिळणारे वेतन व वेतनेतर अनुदान तसेच कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीबाबतचे धोरण स्पष्ट करणे.

(४) अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संमतीबाबत धोरण ठरविणे.

(५) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम २०२३ मधील तरतुदींचा अभ्यास करून आराखडा तयार करणे.

(६) खाजगी विद्यापीठ झाल्यानंतरही मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे आरक्षण आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी शुल्क नियंत्रण यांबाबत मार्गदर्शक तत्त्वे सुचवणे.

(७) महाविद्यालयातील विद्यमान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, जेष्ठता आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण कशा प्रकारे करता येईल, यावर शिफारस करणे.

(८) राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०) नुसार बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीने अशा रूपांतराची व्यवहार्यता तपासणे.

(९) उपरोक्त समिती कार्यकक्षेच्या अनुषंगाने विविध मुद्यांचा सर्वंकष विचार करुन सदर समिती आपला अहवाल **दोन महिन्यांत** शासनास सादर करेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२८१४२२४५७८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.04.28 14:24:26 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. डॉ. भुषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल, (लेखा व परिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
८. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई.
९. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
१०. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी, रोख शाखा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती.